Open Access

IJASSH

International Journal of Arts, Social Sciences and Humanities

(A Quarterly, Refereed, & Peer Reviewed International Journal)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://ijassh.aaassher.org/
ISSN (Online): 2584-1130
Volume 1, Issue 3, September 2023; Pages 21 –31
DOI: 10.5281/zenodo.10351723

Original Research Article

# मराठवाडा - एक दृष्टीक्षेप

मृदुला संजय मोरे व जयश्री जेजेराव पाटील*

इतिहास विभाग, कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर, ४१३५१७ भारत

*Corresponding author E-mail:* jj.patilh@gmail.com

Received: 06 July, 2023 | Accepted: 25 August, 2023 | Published: 29 August, 2023

## प्रस्तावना

आजच्या महाराष्ट्र राज्यातील एक भूप्रदेश त्याच्या भौगोलिक सीमा निश्चित नसून निरनिराळया कालखंडात त्यात बदल होत गेला. तसेच यातील प्रदेशाची नावेही बदलत गेली. आज औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड, उस्मानाबाद (धाराशिव), हिंगोली, जालना, लातूर या आठ जिल्ह्याचा मिळून मराठवाडा असे संबोधले जाते. मराठवाडा येथील 'वाडा' हा शब्द मूळ 'पाटक' या पदाचा विकास होय. पाण्याच्या सान्निध्यावर स्थलनामे बनविण्याचे भारोपीय गणाची म्हणून ऋग्वेदीय व भारतीय आर्याची रित होती. नद, नन्द धातूचा मूळ अर्थ वाहणे त्यावरुन नंदन, लन्दन होय. ऋग्वेदात पथ धातू वाहणे, प्रवाहित होणे या अर्थाने आहे. प्र-पात म्हणजे धबधबा विशेष रीतीने फार उंचीवरुन एकदम खाली पडणारा तो प्रपात या पाच शब्दाला क प्रत्यय लागून व कालौघात ध्वनीचा ट बनून पाट क शब्दाची निर्मिती झाली. पाटक म्हणजे पसरुन भिजणारी सपाठ भूमी मराठी संस्कृती बरोबरच पाटक शब्दाची घडण झालेली आहे.

सातवाहनाच्या काळात आम्रपाटक शब्द असल्याचा उल्लेख स्वर्गीय वा.वि. मिराशीनी केलेला आहे. तसेच पिशाची पदक याचीही नोंद केलेली आहे. येथे पाटक शब्दाचे रुप पदक बनलेले दिसून येते. वाकाटक राज्यकाळात पाटकाचा अपभ्रंश असा वाटक शब्द चांगलाच रुढ होता. त्यांचे राज्य देवगिरी व व-हाडात चालू होते. त्यांचा लेखनकाळ लिखित नाही. या राज्याचा काळ इ.स. २५० ते ५०५ पर्यंत होता. प्रवरज्जाटक असे स्थल ब-याच जुन्या काळात वापरलेला सापडतो. मनीपलीका असे स्थल नाम आलेले आहे. विजयपल्ली वाटक, ध्रुवाटक आणि ब्राम्हण वाटक अशी गावे एकाच लेखात आलेली आहेत. मनीपल्लीका याच संदर्भातील होय. ध्रुवाटक या नावाने गावही आलेले सापडते. आत्रजण वाटक या गावाचा उल्लेख आला आहे. ही वाकाटक काळातील माहिती त्यांच्या कोरीव लेखतून स्वर्गीय वा.वी. मिराशी यांच्या कार्पस इन्स्क्रिप्शनम् इन्डिकारम १९६३ च्या ग्रंथातून घेतलेला आहे.

'वाडा' हे 'पाटक' या संस्कृत शब्दाचे तद्‌भवरुप होय. वाडा किंवा वाडी ही उपपदे प्राचीन काळात दक्षिणेत प्रांतिक प्रशासन विभगांना लावलेली होती. इ.स.१६८४ सालच्या औरंगाबादच्या कागदपत्रात ब्राम्हणवाडा संज्ञेचा वापर अनेकदा ओढापट्ट भूप्रदेशाची नोंद इ.स. १६८२ व १६८५ च्या फारशी कागदात आलेली आहे. गुर्जर पट्टीचा उल्लेख इ.स. १६६६ च्या कागदात आलेला आहे. अचलपूर (मुस्लमानी एचिलपूर) अमरावतीच्या वायव्येस सातपूडयाच्या पायथ्याला वसलेला आहे. त्याच्या एका भागाला परतवाडा 'प्रतिपाटक' असे आज देखील चालू आहे. तेलंगणतील काकतीय राजकुळाची राजधानी असलेला वरंगल नगरात मठवाडा असा भाग आहे. मठ हा शब्द मराठ शब्दाचा व वाडा हा पाटक शब्दाचा अवशेष असावेत. मराठवाडी या संज्ञेचा उल्लेख टिपु सुलतानाच्या कारकिर्दीत प्रथम आलेले होते. हैद्राबाद संस्थानाच्या कागदपत्रतही मराठवाडी हा उल्लेख दिसून येतो. पुढे रुपांतर मराठवाडा असे झाले. असा हा मराठवाडा आठ जिल्ह्याने मिळून महाराष्ट्रातील स्वतंत्र प्रदेश ओळखला जातो.

ऋग्वेदातील दक्षिणापथात, महाभारतातील दंडकारण्यात, रामायणमृत व मत्सपुराणातील दक्षिणापथात मराठवाडयाचा प्रदेश सामावलेला होता. महाभारत काळापासून मराठवाडयाच्या निरनिराळया भागास वेगवेगळी नावे होती असे दिसते. उस्मानाबाद जिल्ह्याचा काही भाग कुंतल देशात तर औरंगाबादचा काही भाग मुलकात आणि नांदेड व बीड जिल्ह्यातील काही भाग अश्मकात प्राचीन काळी सामावलेला होता. अश्मकाचा समावेश सोळा महाजन पदामध्ये होता व त्याचा उल्लेख अष्टाध्यायीत आढळतो. ऐतिहासिक दृष्टया मराठवाडा हे नाव फारसे जुने नाही. १८६४ च्या कागदपत्रात या प्रदेशाला मराठवाडी असे संबोधले आहे. पुढे मराठवाडीचे मराठवाडा हे नाव मराठी भाषिक बहुसंख्या असलेला निझाम संस्थानातील या प्रदेशाला दिले गेले.

**प्राचीन कालीन मराठवाडा**

मराठवाडयाचा अभ्यास करताना इतिहासाच्या दृष्टीकोनातून सुरुवातीस प्राचीन काळाचा विचार करावा लागतो. या काळात मराठवाडयातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक परिस्थिती आणि एकूण लोकजीवन यांचा अभ्यास करावा लागतो. तेंव्हा जुन्या मराठवाडा कसा होता आज कसा आहे स्पष्ट होईल.

पुरातत्वज्ञानाच्या मतानुसार मराठवाडयात मानवाची वस्ती सुमारे ७० हजार वर्षापासून आहे. १८६५ मध्ये वायने या भूभर्ग शास्त्रज्ञाला मुंगी येथे मध्य पुराणअश्मयुगीन दगडी हत्यारे मिळाली. महाराष्ट्रात मिळालेी ही पहिले अश्मयुगीने हत्यारे होत. मानवाने स्थित जीवनास प्रारंभ केला तेंव्हापासून मराठवाडयात त्यांचे अस्तित्व आढळते. इतकेच नव्हे तर महाराष्ट्रातील आद्य शेतकऱ्याची वस्ती संत ज्ञानेश्वराच्या जन्म गावी आपेगाव येथेच पुरातत्वज्ञानात आढळून आली. उत्खननात येथे ताम्रपाषानयुगीन घराचे अवशेष रंगीत खापरे, धान्य व दगडी हत्यारे मिळाली. या वस्तीचा काळ इ.स. पू. १५६४ असा कार्बन-१४ पध्दतीने ठरविण्यात आलेला आहे. पुराणातील वर्णनानुसार मराठवाडयाचा काही भाग नंदाच्या साम्राज्यात असावा, असे दिसते. नव-नन्दडेरा म्हणजे नांदेड असे ही मानले जाते. ज्ञानकोशाखाच्या मध्ये पैठण ही त्यांची दक्षिणेकडील राजधानी होती. पुढे अशोकाच्या लेखातून पेतनिकाचा म्हणजेच पैठण वासियांचा उल्लेख आढळतो. मराठवाडयाचा इतिहास प्रागैतिहासिक काळापासून उपलब्ध होण्यासारखा आहे. इतिहासपूर्व काळी येथे मानव राहत होते हे स्पष्ट दिसते. परळी, गंगाखेड या भागात नवअश्मयुगातील कुऱ्हाडीच्या डोक्या सारखी उपकरणे आढळली आहेत. प्रभू रामचंद्र दंडकारण्यात गोदातीरावर राहत होता हे प्रसिध्द आहे. ऐतिहासिक काळात सम्राट अशोकांना पैठणकर लोक माहित होते. त्याच्या शासनातील पेतनीक व रट्टीक शब्दावरुन कळते.

**सातवाहन घराणे**

महाराष्ट्र व मराठवाडयाच्या प्राचीन इतिहासाचा आरंभ सातवाहन काळापासून होतो. त्यांनीच मराठवाडयाची संस्कृती दृढ केली. ४६० वर्ष या घराण्यात अनेक कर्तबगार राजे होऊन गेले. त्यांनीच शकाचे

निर्दालन केले. वैदिक धर्माचे पुनर्जीवन, विद्याकलाचे संवर्धन, कृषि व्यापार उद्योगाची वृध्दी करुन सांस्कृतिक जिवनाचा पाया घातला. पैठण, तेर, भोकरदन ही गावे व्यापारी पेठा म्हणून याच काळात नावाररुपास आली. अजिंठा व पितळखोरा येथील सुरुवातीच्या लेण्या सातवाहन कालखंडात कोरल्ल्या गेल्या. सातवाहन काळात प्राकृत वाड्मयास आश्रय लाभला, याच काळात बौध्द लेण्याची निर्मिती झाली. पैठण, तेर, भोकरदन ही व्यापारी केंद्रे सातवाहन राज्यात होती. तीच तटबंदी युक्त नगरे असल्याचा उल्लेख परकीय प्रवाशांनी केला. त्यापैकी तेर हे एक नगर होते. सातवाहन काळात तेर-भोकरदन व पैठण कला केंद्र म्हणूनही नावाजलेले होते. तेर भोकरदन येथे सापडलेल्या हस्तीदंती, स्त्री मूर्ती, इटालीतील पॉपे, येथील मूर्तीशी मिळत्या जुळत्या असल्याने सातवाहनाच्या काळात मराठवाडयाचा रोमशी थेट व्यापारी संबंध होता असे सिध्द होते.

**सातवाहन कालीन मराठवाडा**

सिमुक हा सातवाहन घराण्याचा संस्थापक होय. त्याने विदर्भ व संबंध पश्चिम भारतात स्वतःची सत्ता प्रस्थापित करुन राजधानीचे ठिकाण म्हणून मराठवाडयातील पैठणची निवड केली. मराठवाडयाचा बराच भाग आंध्र व कर्नाटकाचा काही प्रदेश त्या काळात होता. त्यांनी स्वतःला दक्षिणापथपती ही पदवी धारण करुन घेतली होती. त्यांनी साधारणपणे २३ वर्षे राज्य केले अशी माहिती जुन्नर नाणे घाटातील आलेखात सापडते. सातवाहन सिमुक नंतर त्याचा भाऊ कृष्णाने अठरा वर्षे राज्य केले पण त्यांने फक्त राज्य टिकवून ठेवण्याचे कार्य केले. त्यानंतर मात्र सातवाहन घराण्याची प्रतिष्ठा वाढविण्याचे कार्य सातकर्णी पहिल्याने केले. हा कृष्णाचा पुत्र होता. त्याचा इतिहासकारात मतभेद आहे. त्याचा नागनीका एक नागकन्येशी झाला. सातकर्णी हा उदार मनाचा होता. त्यांनी स्वतःला अप्रतीहचतक्र अशी पदवी धारण केली. मराठवाडयाचा बराचसा प्रदेश काबीज केला होता. तो वैदिक धर्माचा भक्त होता. त्यामुळे त्याने वैदिक धर्माचा प्रसार केला. त्याच्या काळात तेर, पैठण ही नगरे बरीच व्यापारात समृध्द बनली होती. सातकर्णीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा वेदश्री हा काही काळ राज्य केला. त्याच्या आईच्या हातात राज्यकारभार होतं. वेदश्रीचा भाऊ शक्तिश्री गादीवर आला पण जास्त काही त्याच्या बद्दल माहिती उपलब्ध नाही. मराठवाडयातील पैठण येथे सापडलेल्या मृद शिल्पावरुन त्याचा पैठणशी असलेला संबंध स्पष्ट होतो. ‘गाथा शप्तशती’ या ग्रंथात उल्लेख करण्यात आलेली श्रृंगार शिल्पे पैठण येथे सापडतात. कोडहाने रचलेल्या लिलावई या ग्रंथाचा नायक म्हणजे राजाहाल हाच होय. विजयानंद हा राजा हाचा सेनापती होता. त्याने श्रीलंकेवर स्वारी केली व विजय मिळविला, हालनंतर पुराणात मंटलक, पुरिन्दसेन, सुंदर सातकर्णी, चाकोर सातकर्णी व शिवस्वाती याची नावे येतात. त्यांच्या बद्दल जास्त माहिती मिळत नाही. त्याच्या अगोदर काही काळ सातवाहन सत्तेचा ऱ्हास सुरु झाला होता. पण गौतमी पुत्र सातकर्णी ने गेलेले साम्राज्य परत मिळविले. हा सातकर्णी अत्यंत महत्वकांक्षी व पराक्रमी होता. नाशिकच्या शिलालेखात त्याच्या कार्याविषयी लिखान केलेले आहे. तो एकूण चोवीस वर्ष राज्य केला. याच्या काळात मराठवाडयातील पैठणला (प्रतिष्ठाण) महत्व प्राप्त झाले होते. याचे साम्राज्यविस्तार मराठवाडयातील अश्मक (गोदावरी नदीच्या आसपासचा प्रदेश), मुलक (पैठण व त्याच्या आसपासचा प्रदेश) इत्यादी प्रदेशात केली. त्याने शक यौवनांचा पराभव केला होता. तो वैदीक धर्माचा पुरस्कर्ता होता. गौतमी पुत्र सातकर्णी विषयी लिहिताना डॉ. के.गोपालचार्य म्हणतात. ‘‘हा सम्राट सेनापती म्हणून एक पट थोर असेल तर प्रशासक म्हणून दहापट मोठा होता’’. त्यानंतर याचा मुलगा वशिष्टीपुत्र पुलुमावी हा सातवाहन घराण्याचा राजा झाला. हा पराक्रमी होता त्यांनी अनेक पदव्या धारण केल्या होत्या, त्याने २५ वर्षे राज्य केले. त्याची नाणी पैठण येथे सापडलेली आहेत. त्याने पैठण शहराचा फार मोठा विकास केला. इ.स.२४० मध्ये टॉलेमी या पाश्चमात्य लेखकांनी पुलुमावीची कारकीर्द ही अखेरची समृध्द कारकीर्द होय. सातवाहन घराण्यात वशिष्टी पुत्र सातकर्णी नंतर यज्ञश्री सम्राट झाला. यांना सातवाहनाच्या

प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न केला. पण त्यात जास्त यश आले नाही. याने ही साधारणपणे तीस वर्ष राज्य केले. यानंतर मात्र सातवाहन घराण्यात पराक्रमी राजा झाला नाही.

**सातवाहन काळाती सामाजिक स्थिती**

महाराष्ट्राच्या नकाशावर मराठवाडयाचाठसा उमटविणारे पहिले सातवाहन घराणे होय. सातवाहनाने गोदावरी तिरावरी प्रमुख नगराचा फार मोठा विकास केलेला दिसून येतो. सातवाहन हे वैदीक धर्माचे मान करणारे भक्त असले तरी ते विविध धर्मानाही मान देत असत. सातवाहन काळात लिहिलेल्या याज्ञवलक्य स्तुतीत चातुर्वर्ण्य व चतुराश्रय यांच्या आचारा संबंधी व कर्तव्यासंबंधी स्त्रुत वर्णन आले आहे. समाज रचना वर्णश्रामपध्दतीची होती. तरी सातवाहन त्याच्या समकालीन राज्याच्या उत्कीर्णी लेखातून चातुर्वण्याशिवाय अन्य काही वर्गाचे उल्लेख येतात ते वर्ग शासकीय नोकरी व व्यवसाय यावर आधारलेले आहेत. यात महाभोज, महारटी व महासेनापती यांना सर्वश्रेष्ट मानत असत तर द्वितीय श्रेणीत अमात्य, महामात्य, भाण्डागारिक व शासकीय नोकर व व्यापारी इत्यादीचा समावेश होता, तर तृतीय श्रेणीत वैद्य, लेखक, सुवर्णकार कृषक इ. होते. चतुर्थ श्रेणीत माळी (मालकार), सुतार (वर्धक), कोळी (दसक), लोहार (लोहवणिज) यांचा समावेश होता.

**सांस्कृतिक स्थिती**

सातवाहन काळात मराठवाडयात संस्कृतीची भरभराट होती. युध्द पराक्रमाबरोबर सांस्कृतिक, मनोरंजन विविध कार्यक्रमालाही वेळ दिले जात होते. यात वेळ घालविण्यासाठी त्याच बरोबर आनंदाचा क्षण घाललविण्यासाठी सण उत्सव इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन करीत असत. मल्लयुध्द, शिकार, पोहणे, शरसंधान, विटीदांडू इ. खेळ पुरुषासाठी होते. तर स्त्रियांसाठी सोंगटया, फुगडी, गायन, वादन, नृत्य, गंजीफा, सारीपाठ इत्यादी खेळातून त्या काळातील लोककललेचा आनंद घेत असत.

**धार्मिक स्थिती**

सातवाहन राज्य वैदिक धर्माचे भक्त होते. वैदिक धर्माचे प्रसार कर्ते असले तरी समाजातील बौध्द-जैन धर्माला मानत असत. त्यामुळे समाजात विविध लोक आपल्याला ज्याचा पुरस्कार करायचा असे ते करीत असत. सर्व सामान्य भागवत पंथीय देवदेवता बौध्द, स्तुप, चेत्याची पूजा करीत असत. त्याचबरोबर ग्रामदेवततेही पूजा करीत असत. सातवाहन काळात अनेक लेण्या कोरण्यात आल्या. त्यात मराठवाडयातील पितळखोरा हे उत्तम उदाहरण दिसून येते.

**आर्थिक स्थिती**

सातवाहन काळात मराठवाडयातीलल लोकांची प्रमुख व्यवसाय शेती होता. तरी सातवाहनाच्या योग्य प्रशासनामुळे उद्योग व व्यापार याची फार मोठी वाढ झाली. वेगवेगळया व्यापा-यांनी आपल्या श्रेणी केल्या होत्या. उदा. धर्मिक (धान्याचे व्यापारी), कुंभकार (कुंभार), कोलीक (विणकर), तिलपशिक (तेली), वंशकर (बुरुड), गंधीक (सुगंधी पदार्थाचे व्यापारी) इ. संस्था धंद्याचे नियंत्रण करीत असत.

**वाकाटक काळातील मराठवाडा**

सातवाहन साम्राज्याच्या ऱ्हासानंतर दक्षिण भारतात महाराष्ट्र व विदर्भ भागात वाकाटकांचे राज्य उदयाला आले. याबद्दलची माहिती अजिंठा लेण्याती शिलालेखाद्वारे मिळते. डॉ. मिराशीच्या मते, ‘‘वाकाटकाचे घराणे दक्षिणेकडील होते. त्यांच्या अलाहाबाद जवळील कोसम येथे सापडलेली नाणी वाकाटक घराण्याची राजाप्रवरसेन यांच्या काळातीलल होती.’’ मराठवाडयातील ब-याच जिल्ह्यात वाकाटकाची सत्ता होती. त्यांनी ३०० वर्ष राज्य

केल्याचे उल्लेख आढळतो. अजिंठयाच्या लेण्या मराठवाडयासाठी देणगी होय. नांदेड, औरंगाबाद या शहरावर वाकाटकाचे राज्य होते. त्याबद्दल अनेक पुरावे सापडतात. नंदीतर आणि नंदीतरु या स्वरुपात नांदेडचा इ.स. चौथ्या शतकातला पहिला उल्लेख वाकाटकाचे राज्य नांदेडपर्यंत होते, त्यांचाही प्रत्यक्ष पुरावा आहे. नांदेड जिल्ह्यातील पैनगंगा काठावरील शिऊरची लेणी ही वाकाटकाची देणगी आहे.

वाकाटक घराण्याचा विद्यंशक्ति हा संस्थापक हो अजिंठा येथील आलेखामध्ये त्याची स्तुती मिळते. त्याने अनेक लढाया जिंकून साम्राज्य विस्तार केला होता. त्याची तुलना इंद्र व विष्णुशी करता येते. विंद्याशक्ति नंतर त्याचा मुगला प्रवरसेन हा पहिला राजा झाला. त्याने सम्राट ही पदवी धारण केली होती. त्याचे राज्य बुंदेलखंड ते दक्षिणेत हैद्राबादपर्यंत होते. यात मराठवाडयाचा बराच भाग समाविष्ट होता. त्यांनी चार अश्वमेश यज्ञही करवून घेतले होते.

## मराठवाडयातील सामाजिक स्थिती

वाकाटककालीन कोरीव शिलालेखात मराठवाडयातील सामाजिक स्थिती त्यांची वस्त्रे, अलंकार, केशरचना, शिरोभूषणे, शस्त्रअस्त्रे, घरे, त्याची नित्यपयोगी सामान, भांडी, वाद्ये इत्यादीचे उल्लेख येत नाहीत. या माहितीकरिता तत्कालीन वाड्मय शिल्पे, चित्रे याचा अभ्यास करावा लागतो. वाकाटकाच्या काळी संस्कृत व प्राकृत काव्य रचली होती. पण त्यातील बहुतेक सर्व आता नष्ट झाली. कालिदासाचे ‘मेघदूत’ नावाचे संस्कृत काव्य प्रवरसेनाचे ‘सेतूबंध’ हे प्राकृत काव्य आता उपलब्ध आहेत. तत्कालीन सामाजिक परिस्थिती समजून घेण्याचे उत्तम साधन म्हणजे अजिंठयाची (१६, १७, १९) क्रमांकाची लेणी हे होय. त्याची चित्रेही त्याच काळात काढली होती. सुदैवाने ही लेणी व त्यातील बरीचशी चित्रे अद्याप सुस्थितीत आहेत. तेंव्हा तत्कालीन सामाजिक परिस्थिती समजण्यास त्याचा बराच उपयोग होतो. वाकाटकाच्या काळी देवालय दगडांनी, कुठेतरी विटांनी बांधण्याची पध्दती प्रचारात येऊ लागली होती. या मंदिराचे वर्णन इतरत्र केले आहे. पण राजवाडे, श्रीमंत व गरीब लोकांचे घरे ही बांधण्याकरीता दगड मातीचा उपयोग सर्रास केला जात होता, असे दिसत नाही. अजिंठयाच्या उपरिनिर्दिष्ट लेण्यातील चित्रावरुन तत्कालीन राजवाडे, घरे, दुकाने इत्यादी लाकडाचे असत, असे दिसते. अजिंठा लेण्यातील चित्रावरुन तत्कालीन राजवाडे व श्रीमंत लोकांची घरे उंच लाकडी खांबावर उभारत असत असे दिसते.

अजिंठयाच्या लेण्यातील चित्रावर तत्कालीन समाजाती भिन्न भिन्न वंशांच्या लोकांची कल्पना करता येते. काही लोक काळया वर्णाचे, खुजे व चपटया नाकाचे असे दाखविले आहेत, हे या प्रदेशातील मुळचे लोक आदिवासी व नागवंशी होते. अजिंठयाची लेणी ज्यांनी कोरली ते वंशाचे असावे. म्हणूनच त्यांनी अनेक लेण्यात डोक्यावर फणा असलेल्या नागराजाची शिल्पे कोरली आहेत व चित्रे काढली आहेत. राजे राण्या, ब्राम्हण, दास, दासी इ. आर्य वंशाचे लोक मराठवाडयात सर्वत्र आढळतात. हे गौरवर्णीय उंच व देखणे होते.

मराठवाडयात त्या काळातील स्त्री-पुरुष पोशाख कसे घालत असत हे अजिंठयातील शिल्प व चित्रावरुन समजते.

वाकाटककालीन स्त्री-पुरुषांच्या वस्त्रालंकाराची उत्तम कल्पना करता येते. बहुतेक स्त्री-पुरुष आखूड अन्तरिक (अधोवस्त्र) नेसलेले दाखविलेले आहेत. हे गुडघ्याच्यावर असे म्हणून याला अर्धोरुक अशी संज्ञा असे.

स्त्रियांची ही अधोवस्त्र नेसण्याची पध्दत याच तऱ्हेची होती. हे काही चित्रात त्या पाठमोऱ्या किंवा उभ्या असलेल्या खाली लोंबणाऱ्या कासोटयावरुन दिसते काही स्त्रिया मात्र अधोवस्त्र कच्छरहित पध्दतीने नेसत असत हेही अजिंठयाच्या लेण्यातील चित्रावरुन स्पष्ट आहे.

पुरुष हल्लीच्या हाफपँट सारखा मांडचोळणा घालीत व तो कटिबंधाने कमरेत बांधत त्याला चंडातक असे म्हणत. सतरा क्रमांकाच्या लेण्यातील उजव्या भिंतीजवळच्या खांबावरील यक्ष अशा तऱ्हेचे चंडातक नेसलेला आहे.

पुरुष सामान्यतः उत्तरीय वापरीत ते जानव्याप्रमाणे डाव्या खांबावरुन व उजव्या काखेखालून जाई. त्यामुळे उजवा हात मोकळा राहत असे. कांही चित्रात हे उतरीय पुनः दुमडून डाव्या खांद्यावर टाकलेले दिसते.

तसेच सतराव्या लेण्यातील विवश्ववंतर जातकाच्या एका चित्रात दान मागण्यासाठी अनेक याचक जमले आहेत. त्यामध्ये कडेवर मूल असलेल्या एका स्त्रीवर रंगीत फुले काढलेली चोळी किंवा अर्धबाह्याचे जाकीट घतल्याचे दाखविले आहे. याच लेण्यातील सिंहलावदानांत तर हल्ली महाराष्ट्रीय स्त्रिया घलतात त्याप्रमाणे खणांची हिरवी चोळी घातलेली एक स्त्री दाखविली आहे.

वाकाटकाळी स्त्री पुरुषांना अलंकाराची मोठी आवड होती, असे दिसते व्यापारी सामान्य व गरीब लोक यांच्या अंगावर दागिने दिसत नाहीत, पण राजे, राजपुत्र उच्चपदस्थ अधिकारी, राण्या, श्रीमंत लोकांच्या स्त्रिया यांच्या दासी यांनी विविध प्रकारचे अलंकार घातलेले अजिंठयाच्या चित्रात आढळून येतात. ज्यात रत्नजडित मुकूट, रत्नजडित कुंडले, रत्नाचे व मोत्याचे हार, मनगटे, अंगठया दिसतात.

स्त्रियांचे अलंकार अत्यंत सुंदर सध्याच्या बिंदी सारख्या अलंकार त्याला लाटिका म्हणत. स्त्रिया मोत्याचे जाळे केसात घालत अजिंठयाच्या लेण्यात कोठेही स्त्रियांच्या नाकात नथ दिसत नाही. क्ष्यामुळे त्या काळात नथ घालण्याची प्रथा नव्हती हे निश्चित. यावरुन एकंदरीत मराठवाडयातील स्त्रियांच्य अंगावरचे अलंकार नाजूक व सुंदर होते यात शंका नाही.

युध्दाच्या शस्त्रास्त्रापैकी तलवारी, धनुष्य, बाण, भाले, बरचे, खंजीर यांची चित्रे आली आहेत. तलवारी बहुधा वाकडया आकाराच्या असत. क्वचित सरळ आकाराच्याही म्यानात घालून घोडस्वारांनी आपल्या पट्टयांना बांधलेल्या दिसतात.

मराठवाडयात त्याकाळातील वाद्य आजही मृदंग, शंख, झांजी, मुरली, एकतारी किंवा दोनतारी. मृदंग गळयात पट्यांनी समोर बांधून वाजविली जात असे आजही आहे.

मराठवाडयात त्याकाळात हत्ती, घोडे, गाय, बैल, वाघ, सिंह, हरिण, माकडे, कुत्रे हे चित्रात रंगविलेले दिसतात. उंट मात्र कोठेही आढळत नाहीत. जलचर प्राण्यामध्ये मासे, कासव व सुसरी दिसतात. इतर स्थलचर व जलचर प्राण्याची चित्रे प्रसंगाभावी काढलेली दिसत नाहीत.

अशा पध्दतीने मराठवाडयात एकंदरीत वाकाटककाळात समाजजीवन अतिशय चांगले होते.

**धार्मिक परिस्थिती**

वाकाटकांच्या काळी अभूतपूर्व धार्मिक जागृती होती. वाकाटकवंशाच्या मूळपुरुष गृहपीत वाकाटक हा बौध्दधर्मानुयायी होता. त्याच बरोबर वाकाटकांच्या काळी पौराणिक हिंदू धर्माचा मोठा उत्कर्ष झाला. या काळात राज्यात सर्वत्र अनेक हिंदू देवालये उभारली होती. काही वाकाटक राजे शिवोपासक असल्याने इतर देवाच्या मंदिरापेक्षा भगवान शंकराची देवालये पुष्कळ निर्माण झाली असावी. पण कोरीव लेखाच्या अभावी त्याची फारशी माहिती मिळत नाही.

वाकाटकांच्या काळात मराठवाडयात हिंदू धर्माप्रमाणे बौध्द धर्मही प्रचलित होता. संसारातील आपत्तीमुळे आरोग्य, ऐश्वर्य, जीवित इत्यादिकांची क्षणभंगुरता ज्यास पटली आहे. अशाच धर्माचे विशेष आकर्षण असे. हरिसेन नृपतीचा सचिव वराहदेव याला ऐहिक वस्तूचे क्षणभंगुरत्व पटल्यामुळे त्याने अजिंठा येथे आपल्या मातापित्यांना उद्देशून एक भव्य विहार लेणी कोरविले व ते गवाक्षे दरवाजे, सुंदर, चित्रावली अप्सराच्या व इतर मूर्ति इत्यादिकांनी सुशेभित केले. क्ष्याच्या मागील बाजूस बुध्द मूर्ती असून जवळच पाण्याचे टाके व नागराजाची मूर्ती असलेले लहान लेणे कोरले आहे. हे सुंदर लेणे त्याने बौध्द संघाला अर्पण केले.

**सांस्कृतीक परिस्थिती**

वाकाटकाचा काळ मराठवाडयासाठी सांस्कृतिक प्रगतीचा काळ समजला जातो. या काही अनेक लेण्या, मंदिराची उभरणी करण्यात आली आहे. त्यांची धर्म, विद्या व कला कौशल्यास दिलेल्या उदार आश्रयाबद्दल प्रसिध्द आहे. वाकाटक राजे हे शिवोपासक होते. पण प्रभावती गुप्तेच्या प्रभावामुळे तिचा पती द्वितीय रुद्रसेन विष्णुचा उपासक झाला.

वाकाटकाच्या काळात लेण्या बरोबरच मंदिरे उभारणीचा उल्लेख मिळतो. आजच्या रामटेक पर्वतावर त्याचा नमुना अवशेष रुपात पहावयास मिळतो. त्याच बरोबर वाकाटकाच्या मांडलिकांनी मंदिरे उभरली. एक जबलपूर जिल्ह्यातील बहुरीबदजवळ निगवा दुसरे विंध्यपर्वतात नाचण येथे आहे. त्यांच्या मंदिराचे वैशिष्टये म्हणजे आच्छादिलेला प्रदक्षिणापथ आहे. गर्भगृह चौदर आकाराचे सुंदर सुरेख नक्षीकाम आहे. काही मंदिरांना लेण्यांचा आकार देण्यात आला.

वाकाटकांनी मंदिराबरोबर मराठवाडयात सांस्कृतिक ठेव म्हणून ताठ मानाने नैसर्गिक आपत्तीचा मारा सहन करीत, अजिंठा येथील महायान गुंफा (लेणी क्रमांक १, २, १६, १७ व १९) हे त्याकाळातील सामाजिक सांस्कृतिक लोकजीवनाचे स्थापत्यरुपी व चित्रकलावरुन दर्शन घडवितात.

## राष्ट्रकुट काळातील मराठवाडा (इ.स. ७५३ ते ९७३)

सातवाहनांच्या अधःपतनानंतर मराठवाडयात राजकीय वादळ सुरु झाले यातून सरंजामशाही पध्दती सुरु झाली. केंद्राची सत्ता दुबळी बनली. पैठण या केंद्रस्थनावर अनेकाने आक्रमणे केली. सातवाहनाचे वारसदार आंध्रात गेली. यामुळे मराठवाडयात अनेक छोटे छोटे राज्य पुढे आले. इ.स.आठव्या शतकात राष्ट्रकूट सत्तेचा उदय झाला. राष्ट्रकूट राजाचे मूळ गाव ‘लातूर’ होय. या राजघराण्याची सुरुवातीची राजधानी वेरुळ (एलोरा) परिसरात होती. मराठवाडयातील नांदेड जिल्ह्यातील ‘कंधार’ ही त्यांची उत्तर काळातील उपराजधानी होय. राष्ट्रकुटाने सुमारे २२४ वर्षे राज्य केले.

राष्ट्रकुटाच्या काळात जगप्रसिध्द वेरुळच्या कैलास लेण्याची निर्मिती झाली. यांच्या काळात मराठवाडयातील लातूर व कंधार हे महत्वाचे शहरे होती. इ.स. ८ ते १० व्या शतकापर्यंत महाराष्ट्रावर अधिराज्य गाजवून एकजिन्सी राज्य तयार केले.

राष्ट्रकुटाच्या तीन शाखा होत्या.

१. कुंतलेश्वर राष्ट्रकूट हे सातारा जिल्ह्यातील सर्वात प्राचीन घराणे.
२. विदर्भातील राष्ट्रकूट इ.स. ६व्या शतकात हे कलचूरीचे मांडलिक होते.
३. व ह्या दोन्हीपेक्षा प्रसिध्द तिसरे राष्ट्रकूट घराणे मराठवाडयातील औरंगाबाद जिल्ह्यात उदयास आले.

## राष्ट्रकूट कालीन राजकिय स्थिती

चालूक्याच्या नंतर राष्ट्रकूट पुढे आले राष्ट्रकूटाचा प्रमुख पुरुष संस्थापक दंतीदुर्ग होय. सम्राट विक्रमादित्य चालूक्यनरेन्द्र याने दंतीदुर्गावर खूश होऊन मोठी जहागिरी दिली. ‘पृथ्वीवल्लभ’ ही पदवी दिली. विक्रमादित्याच्या मृत्यूनंतर दंतीदूर्ग स्वतःला शासक म्हणून घेऊ लागला. तो इ.स. ७५७ ते ७७३, गोविंद द्वितीय इ.स. ७७३ ते ७८०, ध्रुव इ.स. ७८० ते ७९३, गोविंद तृतीय इ.स.७९३ ते ८१४, अमोघवर्श इ.स.८१४ ते ८७८, कृष्ण द्वितीय इ.स.८७८ ते ९१४, इंद्र तृतीय इ.स.९१४ ते ९२२, अमोघवर्ष तृतीय इ.स. ९२२ ते ९३९, कृष्ण तृतीय इ.स.९३९ ते ९६८, खोमिग इ.स. ९६८ ते ९७३, कर्क द्वितीय इ.स. ९७३ ते ९७५.

असे राष्ट्रकूट राजे झाले, यात कृष्ण, इंद्र, ध्रुव, गोविंद हे राजे पराक्रमी होते. त्यांनी साम्राज्यविस्तार मोठया प्रमाणात केला. आपला दरारा शेवटपर्यंत कायम ठेवला होता. त्यांच्या काळात भारतात पराक्रमी राजे

नव्हते, पण त्यांच्यातच भांडणे सुरु झाली होती. त्यामुळे राजधान्य बदलाव्या लागल्या. कंधार, लातूर, धारुर, धर्मापूरी हे आजचे मराठवाडयातील शहरे आहेत.

### राष्ट्रकुटकालीन मराठवाडयाची सांस्कृतिक स्थिती

राष्ट्रकूट काळात मराठवाडयात कलेच्या क्षेत्राच्या क्षेत्रात उल्लेखणीय कामगिरी केली. वाकाटकाप्रमाणेच यांच्या काळात वेरुळ येथील कैलास मंदिर याचे आगळे वेगळे रुप आहे. संत ज्ञानेश्वरानी म्हटले की केवढे कठीण कोवळेपण, नाथंनी म्हटल्यांप्रमाणे आधी कळस मग पाया याचे उत्तम उदाहरण कलाकारांनी करुन दिले आहे. हे मंदिर राष्ट्रकूट कलेचा हा सर्वश्रेष्ठ नमूना आहे.

### चालूक्य कालीन मराठवाडा

राष्ट्रकूटाच्या पतनानंतर चालूक्याचा उदय झाला. चालूक्याच्या दोन शाख होत्या बदामीचे चालूक्य व कल्याणीचे चालूक्य मराठवाडयात कल्याणीचे चालूक्याचा प्रभाव होता. इ.स. ७५७ मध्ये बदामी चालूक्यांच्या सत्तेचा शेवट दंतीदूर्ग या राष्ट्रकूट सत्तेचा शेवट चालूक्याचा राजा तैलपाने इ.स.९७३ मध्ये केला. त्यामुळे उतरकालीन चालूक्याची कल्याणी येथे सत्ता उदयाला आली. कल्याणी ही चालूक्याची राजधानी होती. मराठवाडयात उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा या गावाजवळ कल्याणी नावाचे गाव आहे. आज हे गाव कर्नाटकात आहे. यावरुन असे दिसून येते की चालूक्यानी कर्नाटक व महाराष्ट्र राज्यात राज्य केले. मराठवाडयात चालूक्याने सांस्कृतिक देणगी फार मोठया प्रमाणात दिलेले आहे. त्यातील मराठवाडयात होट्टल जि. नांदेड, कंधार धर्मापूरी, अंबाजोगाई, येरगी, रामपूर, करडखेड, तडखेल जि. नांदेड इत्यादी अनेक ठिकाणी दिसून येतात. यांच्या काळात शिलेखावरुन ही माहिती मिळते. सांस्कृतिक ठेव्यावरुन सामाजिक, राजनैतिक, आर्थिक परिस्थिती चांगलीच समजते. चालूक्यांनी शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याचे उल्लेख तडखेल येथील शिलालेखावरुन समजते.

### चालूक्यकालीन सामाजिक स्थिती

चालूक्यकाळातील मराठवाडयाची सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी स्थिती मंदिरे, लेणी यावरुन लक्षात येते. याबद्दलचे वर्णन धर्मपुरी येथील शिलालेखावरुन लक्षात येते.

समाज जीवनाचे प्रत्यक्ष दर्शन होट्टल जि. नांदेड येथील मंदिरावरील विविध शिल्पावरुन त्या काळातीलल हा समाज शिव उपासक होता. तेथीलल राजा, विविध दासी, प्रजा इत्यादीचे केशरचना, वेशभूषा, नृत्य संगीत, शस्त्रअस्त्रे, वाद्य, वाद्याचे प्रकार इत्यादी येथी शिल्पावरुन कळून येते. त्याकाळात लोकांचे मनोरंजनात जास्तीतजास्त लक्ष्य होते.

शेती सुधारीत असावी कारण येथील शिल्पात नारळ, द्राक्षे इत्यादी फळे वस्त्रावरुन येथे कापूस व रेशम इत्यादीचे उत्पन्न लोक करीत असावेत. त्यामुळे सामाजिक व्यवस्था मराठवाडयाची त्याकाळात समृध्द होती, असे दिसून येते.

### धार्मिक स्थिती

मराठवाडयातील चालूक्य काळातील धार्मिक परिस्थितीचे दर्शन अनेक ठिकाणच्या मंदिरावरुन दिसून येते. मराठवाडयातील शिवालय त्यात करडखेड, तडखेल, होट्टल, एकलारा इत्यादी ठिकाणच्या मंदिरांचा समावेश होतो.

चालूक्य काळात मराठवाडयाची सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक प्रगती अतिशय चांगली होती.

**मध्ययुगीन काळातील मराठवाडा**

प्राचीन काळात महाराष्ट्राबरोबरच मराठवाडयाची राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, परिस्थिती व लोकांचे लोकजीवन भरभराटीस आले होते. सातवाहन, राष्ट्रकूट, वाकाटक, चालूक्य इत्यादी घराण्यांनी मराठवाडयात अद्वितीय कार्य केले त्यामुळे समाजात सुख व शांती दिसून येत होती. मराठवाडयात विविध जातीधर्माचे लोक राहत असत. त्यांच्यात जातीभेद वर्णभेद नव्हता. एकमेकांशी द्वेष करीत नसत. कोणीही एकमेकांच्या धर्माबाबत कटू बोलत नसत.

मध्ययुगीन काळात सुरुवातीस (यादवकाळ) मराठवाडयात सुखशांती होती पण नंतरच्या काळात समाजात अस्थिरता निर्माण झाली होती.

ज्या भौगोलिक वैशिष्टयामुळे प्राचीनकाळी या मराठवाडयाचे महत्त्व वाढले तीच पुढे त्यांच्या विध्वंसास कारणीभूत ठरली. चौदाव्या शतकानंतर दिल्लीच्या सुलतानांना या प्रदेशाच्या भौगोलिक वैशिष्टयाची जाणीव होती. म्हणून प्रथमतः त्यांनी मराठवाडयावर आपलले लक्ष्य केंद्रित केले. या भागावर आपले प्रभुत्व असेल तर दक्षिण भागावर आपल्या प्रभुत्व मिळविण्यास अवघड जाणर नाही. यासाठी १४ व्या शतकातील बहामनीचे राज्य व अठराव्या शतकातील निजामाचे स्वतंत्र हैदराबाद संस्थान या राज्याच्या निर्मितीने हे दाखवून दिले आहे. त्यामुळे मध्ययुगीन काळातील या प्रदेशाच्या स्वामित्वासाठी सतत स्पर्धा चालू होती. परिणामतः सांस्कृतिक प्रगतीचे केंद्रस्थान असलेला हा मराठवाडा युध्दभूमीत रुपांतरीत झाला. सतत आक्रमणे लढाया आणि रक्तपात यांनी या प्रदेशास छिन्नविछिन्न केले. आक्रमक अनुदान आणि निष्ठूर वृत्तीचे असल्यामुळे अत्याचार आणि विध्वंसक याचे इथे थैमान सुरु झाले. जे पूर्वी प्राप्त झाले ते सर्व या विध्वंसात नष्ट झाले. चौदाव्या शतकाच्या अखेरीस पडलेल्या भयानक दुष्काळाने आणखी कहर केला. युध्द जर्जर झालेल्या या विभागातील अनेक गावे ओस पडली. मनुष्यबळी किती गेली याची गिणती नाही. परंतु दुष्काळानंतर बहामनी काळात स्थिर करण्याचा जो प्रयत्न झाला त्यावेळी दोन-दोन किंवा तीन-तीन गावे एकत्र करुन वसवावी लागली. यावरुन झालेला विध्वंसाची कल्पना येऊ शकते.

मध्ययुगीन काळात सुरुवातीला मराठवाडयात यादव घराणे उदयास आले.

**यादव कालीन मराठवाडयाची स्थिती**

मराठवाडयातील मराठी संस्कृतीच्या जडणघडणीत ज्या राजघराण्याचे नाव घेतले जाते त्या यादीत यादव घराण्याचा क्रमांक पहिला लागतो. त्यांच्या कार्यामुळे ९ व्या शतकापासून ते १४ व्या शतकाच्या सुरुवातीचा काळ होता. या पाच शतकात समस्त महाराष्ट्रावर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले.

सुरुवातीला हे घराणे राष्ट्रकुटाचे मांडलिक म्हणून उदयास आले, पण त्यांच्या उतरत्या काळात कल्याणीचा चाललुक्य, दुसरा भिल्लमाचे इ.स. ९७५ ते १००५ मध्ये वर्चस्व मान्य केले. शेवटी चालूक्याच्या ऱ्हासात संधी साधून भिल्लम पाचव्याने कल्याणची राजधानी जिंकून देवगिरी उर्फ दौलताबाद जि. औरंगाबाद येथे इ.स. ११८७ मध्ये स्वतंत्र राज्याची घोषणा केली. यादव हे यदुवंशी असून ते गुजरात मधून महाराष्ट्रात आले.

या घराण्याची माहिती प्रामुख्याने त्यांच्या पुराभिलेखातून व हेमांद्री लिखित ‘चतुर्वगचिंतामणी’ ग्रंथाच्या व्रतखंडातून मिळते. हे यादव आपणास श्रीकृष्णाचे वंशज म्हणवित आणि द्वारावती पुरधराधीश्वर (द्वारकाश्रेष्ठनगरीचे अधिपती) असे पदवी धारण केली.

यानंतर बाराव्या शतकाच्या शेवटी या वंशात पाचवा भिल्लम हा बलाढय राजा उदयास आला. त्याने उत्तरकालीन चालूक्यानंतर प्रबळ झालेली कलचुरीचा पराभव करुन चालूक्याच्या साम्राज्याचा बराचसा भाग काबीज केला आणि आपल्या राज्याची दक्षिण सीमा कृष्ण नदीपलीकडे नेली. नंतर त्याने आपली राजधानी देवगिरी (दौलताबाद) येथे नेली आणि तेथे स्वतःचा राज्याभिषेक करवून घेतला.

### यादवकालीन मराठवाडयाची सांस्कृतिक स्थिती

यादव काळात मराठवाडयात सांस्कृतिक दृष्टया विविध क्षेत्रात क्षणीय प्रगती झाली. यादव राजे हिंदू धर्माला राजाश्रय दिला. तरी त्यांचे एकूण धोरण संहिष्णू होते. नरसिंह ही यादवाची कुलदेवता होती. या काळात शैवपंथाचा जोर वाढून अनेक शैवमंदिरे बांधण्यात आली. या काळात हेमाडपंती मंदिरशैली होती. मराठवाडयात अशी हेमाडपंती मंदिरे आजही आढळतात. हेमाद्री हा राजा महादेवाचा प्रधान होता.

### धार्मिक स्थिती

या काळात अनेक धर्मपंथाचा उदय झाला त्यांनी दान ब्राम्हणांना पंचमहायज्ञांच्या अनुष्ठानाकरिता दिली होती. वैदिक यज्ञयागाचा लोप झाला होता. धार्मिक वृत्तीचे दानशूर लोक अग्रहार देत व अन्नसाठे स्थापित असत. बौध्द धर्म बहूतेक नामशेष झाला होता. पण उल्लेखनीय गोष्ट ही की यादवांचा मांडलिक शिलाहार भंडरादित्य याने इरुकुडी गावाजवळ केलेल्या गंडसमुद्र तलावाच्या काठी हिंदू व जैन देवालयाप्रमाणे बौध्द देवालयही बांधले होते. यादवांनी जैन धर्माला अनेक दाने दिली त्यांच्या काळी विरशैव किंवा लिंगायत नाथ, महानुभाव व वारकरी पंथाची निर्मिती झाली व भरभराटीस आले. पंढरपूरच्या विठ्ठालाला यादवांनी दिलेल्या देणग्या येथील कोरीव लेखात आढळतात. यातील बहुतेकांना राजाश्रय होता.

### सामाजिक स्थिती

यादवांच्या काळात मराठवाडयात समाज चार वर्णावर आधारलेले होते. त्यात ब्राम्हण क्षेत्रीय, वैश्य, शुद्र अशा वर्ण पध्दती होत्या. यातूनच पुढे अनेक जाती तयार झाल्या. त्यातील कांही जाती व्यवसायावरुन पडल्या. वारकरीसंप्रदायातील संतही वेगवेगळया जातीधर्मातील होते. ते या संप्रदायात एकत्र येऊन सामाजिक ऐक्य घडवून आणले. त्यात ब्राम्हण, कुंभार, शिंपी, सोनार, न्हावी, माळी, चांभार, महार हे त्याकाळात अनेक जातीतून आले होते. यावरुन अशा अनेक जाती त्याकाळात होत्या. त्यात गोरा कुंभार, सावतामाळी, सेनान्हावी, नामदेव शिंपी इत्यादी संत मंडळी होती. याकाळात चार वर्णाऐवजी पाचवा वर्णही होता. त्यात कारागिरांचा हुन्नरी समावेश होता. कोष्टी, कोळी, खाशी, बुरुड, धोबी असे अनेक धंदेवाले अत्यंज म्हणून गणलले जात. त्याचबरोबर समाजात हीन कर्म करणारे डोंब व चांडाळ हेही होते. वैश्य व शुद्र जास्त भेद केला जात नव्हता. ज्या वर्गावर समाज चालत होता. त्या वर्गाची स्थिती अतिशय वाईट होती. अशा परिस्थितीत समाज व्यवस्थेबरोबरच आर्थिक स्थिती योग्य नव्हती.

### संदर्भ


१. डॉ. मोरवंचीकर, रा. श्री. १९९१, सातवाहन कालीन महाराष्ट्र, नागपूर, पिंपळपूरे ॲन्ड कं. पब्लीशर्स, पृ. १०
२. प्रा. डॉ. रोडे सो. श., १९९९, मराठवाडयाचा इतिहास, औरंगाबाद, विद्याबुक्स पब्लीशर्स पृ. १
३. प्रा. काळे भ., (संपा), १९८६, मराठवाडा काल आणि आज, जालना, संकेत प्रकाशन पृ. ५
४. डॉ. काटे पी. व्ही., १९९९, मराठवाडयाचा इतिहास, औरंगाबाद, कैलास प्रकाशन पृ. ६
५. प्रा. भांडवलकर एस.एस., २००२, मराठवाडयाचा इतिहास, लातूर, अभिजित पब्लीकेशन, पृ.४३
६. प्रा. गाठाळ एस.एस., २००२, भारताचा इतिहास (इ.स. ६५० पर्यंत), औरंगाबाद, कैलास पब्लीकेशन, पृ. २५१
७. डॉ. मोरवंचीकर रा. श्री., १९९०, प्राचीन भारत, नागपूर, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लीशर्स पृ. २२०

८. डॉ. देगलूरकर, गो. भा., डॉ. ढवळीकर म. क., प्रा.गायकवाड रा.ज्ञा., १९७३, प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, पृ.१३०, १३१

९. डॉ. परळकर र. कृ. १९९२, प्राचीन भारताचा इतिहास, औरंगाबाद, श्री साईनाथ प्रकाशन पृ. १५५

१०. मिराशी, वा. वि. १९५७, वाकाटक नृपती आणि त्यांचा काल, नागपूर, विश्व विद्यालय पृ. १०३, १०४

११. पं. जोशी म.(संपा), १९७०, भारतीय संस्कृति कोश, खंड ६ पुणे, भारतीय संस्कृती कोश मंडळ पृ. ७५०

१२. तर्क तीर्थ जोशी ल, (संपा), १९८९, मराठी विश्वकोश, खंड १४ मुंबई, सचिव महाराष्ट्र राज्य मराइी विश्वकोश निर्मिती मंडळ पृ. ६७